सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २१६ | मंगळवार, दि. २८ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## आजचे अभीष्टचिंतन



**श्री. सुनिल भामरे**
अमळनेर



**श्री. उमेश साळुंखे**
माजी सरपंच, मारवड



**श्री. निवृत्ती बागुल**
माजी पं. स. सदस्य, अमळनेर



**सौ. हिराबाई पाटील**
अमळनेर

## गो सन्मान आव्हान अभियानानिमित्त श्री मंगळग्रह मंदिरात विशेष पूजा



**गोलबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : संपूर्ण भारतात गोहत्या कायमस्वरूपी थांबावी आणि गोमातेला राष्ट्रीय सन्मान मिळावा, या मागणीसाठी दि. २७ एप्रिल ते २७ जुलै २०२६ या कालावधीत देशभर ‘गो सन्मान आव्हान अभियान’ राबविले जाणार आहे. या अभियानाचा प्रारंभ आज, सोमवार, दि. २७ एप्रिल रोजी दुपारी ४.०० वाजता श्री मंगळग्रह मंदिरात विशेष पूजेचे आयोजन करण्यात आले.

यात्रसंगी गोमातेप्रती कृतज्ञता व्यक्त करत गोसंरक्षणाचा संकल्प करण्यात आला. मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सहसचिव दिलीप बहिरम, मंगल सेवेकरी भूषण पाटील, कैलास महाजन, रावसाहेब पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. गोमातेचा सन्मान हा हिंदू संस्कृतीचा सन्मान असल्याने गोमातेच्या सन्मानाप्रीत्यर्थ जयघोष करण्यात आला. या अभियानाच्या माध्यमातून जनसामान्यांमध्ये गोसंरक्षणाबाबत जागृती निर्माण करण्याचा हा विविध स्तरावर सर्वत्र प्रयत्न केला जात आहे. यामध्ये सेवा, सुरक्षा आणि सन्मान हे ब्रीद अंगीकारले आहे.

# अवघे अमळनेर भक्तीरसात चिंब

## मोहिनी एकादशीनिमित्त रथ मिरवणुकीला जनसाक्षीने मंगलमय सुरूवात





ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**अमळनेर : श्रद्धा, उत्साह अन् चैतन्यमयी वातावरणात मोहिनी एकादशीनिमित्ताने सोमवार, दि. २७ एप्रिल रोजी सायंकाळी ७.३० च्या सुमारास दरवर्षीप्रमाणे येथील श्री सद्गुरु सखाराम महाराज विठ्ठल–रुख्मिणी संस्थान वाडी येथे लालजींच्या रथाचे विधीवत पूजन होऊन या मिरवणुकीचा प्रारंभ झाला. रथामध्ये लालजी म्हणजेच भगवान श्रीकृष्ण यांची मूर्ती स्थानापन्न केलेली होती. याप्रसंगी परंपरेनुसार विविध समाजातील मानकऱ्यांच्या हस्ते विधिवत रथ पूजन होऊन रथाला प्रदक्षिणा घालण्यात आली. यावेळी प. पू. संतश्री प्रसाद महाराज यांच्या मार्गदर्शनात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संत श्री सखाराम महाराज यांचा जयघोष करण्यात येऊन रथ मिरवणूक मार्गस्थ झाली. या रथ मिरवणुकीला शेकडो वर्षांची परंपरा लाभलेली आहे. संपूर्ण खानदेशवासीयांना या रथ मिरवणुकीचे आकर्षण असते. गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही रथाला ट्रॅक्टरद्वारे सारथ्य दिले गेलेले आहे. अक्षय्य तृतीयेला स्तंभारोपण व ध्वजारोहणाने सुरू झालेल्या या यात्रेनिमित्ताने मोहिनी एकादशीच्या दिवशी ऐतिहासिक रथ मिरवणूक काढली जाते.**

### मुस्लीम बांधवांचा सहभाग

पहिली मोगरी रथाला लावण्याचा मान मुस्लीम बांधवांना दिला जातो. त्यानुसार तो आजही दिला गेला. त्यानंतर देशमुख, पाटील, धनगर समाजाची रथ सुरक्षित आणण्याची जबाबदारी असते. समाधीजवळ मंडप उभारण्याचा मान माळी समजाला असतो. पालखीचे मेणे वाहण्याचा मान भोई समाजाला असतो. तो आजही परंपरेनुसार त्यांना देण्यात आला. रथ मिरवणुकीत घोडेस्वार, भगवे झेंडे, भालदार, चोपदार, टाळ–मृदंगाच्या गजरातील वारकरी, कलशधारी महिला यांच्या आकर्षक पेहरावामुळे मिरवणुकीची शोभा आणखीनच वाढल्याचे दिसले. वाडी संस्थानातील चौकात सायंकाळपासूनच लालजींच्या अर्थात भगवान श्रीकृष्ण व भगवान विठ्ठल यांच्या दर्शनाची आस लावत हजारो भाविक जमल्याचे दिसून आले.

### ऐतिहासिक रथ

हा रथ मलबार सागाच्या लाकडापासून बनविण्यात आला असून त्याला शेकडो वर्षांची परंपरा असल्याचे मानले जाते.

### रथावर पुष्पवृष्टी होऊन दिमाखात निघाला रथ

रथावर बसण्याचा मान ब्रम्हे व वैद्य पुजारी यांना आहे. त्याप्रमाणे ते स्थानापन्न झाले. रथाच्या पुढे भगवे ध्वजधारक दोन घोडेस्वार होते. त्याच्यापाठोपाठ वारकरी मंडळी होती. ट्रॅक्टरवर नगारेसोबतच अब्दागिरीधारक सेवेकरी व मशालधारी सेवेकरी होते. यावेळी अनेक ढोल–ताशांच्या आवाजाने अक्षरशः वाडी चौक दुमदुमल्याचे दिसून आले. तसेच लेझीम मंडळाचे जल्लोषपूर्ण नृत्य, रथाच्या मागे लहान गाड्यावर महाराजांच्या चांदीच्या पादुका व मुखवटा ठेवण्यात आले होत्या. रस्त्यावर दुतर्फा भाविकांना श्रीफळ, केळी, खडीसाखरेचा प्रसाद देण्यात येत होता. रस्त्यावर ठिकठिकाणी प्रसाद महाराजांवर व स्थावर पुष्पवृष्टी करण्यात येत होती.



यात्रोत्सवानिमित्त बोरी नदीपात्रात खेळणी, खाद्यपदार्थांची तसेच विविध वस्तू विक्रीची दुकाने थाटली जाऊ लागली आहेत.

### मिरवणूक मार्ग

वाडी संस्थानातून प्रारंभ होत सराफ बाजार, दगडीदरवाजा, फरशी पूल, पैलाड मार्गे मिरवणूक मार्ग असून तो पहाटेच्या सुमारास पुन्हा वाडी संस्थानात दाखल होईल.

### यांनी केले पौरोहित्य

मुख्य पौरोहित्य केशव पुराणिक यांनी केले. जयप्रकाश देव, अभय देव यांनी सपत्नीक रथाचे पूजन केले.

### पोलीस प्रशासन सज्ज

यात्रोत्सवांतर्गत आज रथ मिरवणुकीवेळी पोलीस शिपाई, केंद्रीय राखीव दल, होमगार्ड यांच्यासह साध्या वेशातील पोलीस कर्मचारी सज्ज असल्याचे दिसून आले.

### अनेक मान्यवरांची उपस्थिती

रथ मिरवणुकीच्या प्रारंभी विधिवत पूजनावेळी लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ.परिक्षित बाविस्कर, प्रांताधिकारी मयूर भंगाळे, डीवायएसपी विनायक कोते, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, पालिकेचे मुख्याधिकारी गणेश शिंदे, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, नगरसेविका सौ. जयश्रीताई पाटील, नगरसेवक महेश देशमुख, पंकज चौधरी, विजय कहारू पाटील, अनिल महाजन, दादा पवार, गोपी कासार, राजू फापोरेकर, भरत ललवाणी, सचिन पाटील, सुयोग धनगर, भाजपचे सरचिटणीस देवा लांडगे, भाजपच्या तीर्थक्षेत्र पश्चिम जिल्हाध्यक्ष सुरेश बाविस्कर, माजी नगरसेवक बबली पाठक, विक्रांत पाटील, नरेंद्र संदानशिव, सौ. अलकाताई चौधरी, गौरव पाटील, डॉ. अनिल शिंदे, शिवसेनेचे संजय कौतिक पाटील, वाडी संस्थानाचे विश्वस्त रवींद्र देशमुख, रविकांत देशमुख, उदय देशपांडे, प्रा. डॉ. प्रभाकर जोशी आदींसह विविध सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक संस्था, संघटनांचे प्रतिनिधी तसेच विविध ठिकाणांहून आलेले भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा–जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा–तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
**जय स्वदेशी...!!**

### दिनविशेष

२८ एप्रिल

- होम रुल लीगची स्थापना झाली.
- भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) ने ‘PSLV-C9’ उपग्रह प्रक्षेपित केला.

## तापमानाचा पारा ४२ अंशांवर; ग्रामीण रुग्णालयात उष्माघात कक्ष सज्ज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर: सध्या अमळनेर शहरासह संपूर्ण जिल्ह्यात सूर्य आग ओकत असून, उन्हाच्या तीव्रतेने यंदाच्या हंगामातील सर्व उच्चांक मोडीत काढले आहेत. रविवारी, २६ एप्रिल रोजी अमळनेरचे तापमान तब्बल ४२ अंश सेल्सिअसवर पोहोचले होते, ही यंदाच्या हंगामातील सर्वोच्च नोंद ठरली आहे. गेल्या पंधरवड्यापासून ४० ते ४१ अंशांवर स्थिरावलेला पारा आज थेट ४२ अंशांच्या पार झाल्याने अमळनेरकरांच्या अंगाची लाहीलाही होत असल्याचे दिसून आले.

तीव्र उष्णतेमुळे अमळनेरकरांनी घराबाहेर पडणे टाळले आहे. रविवारी सुटीचा दिवस असूनही शहरातील मुख्य रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळाला. उष्णतेच्या लाटेमुळे शहरात दुपारच्या वेळी शुकशुकाट असल्याचे चित्र निर्माण झाले होते. दुपारी काही अंशी ढगाळ वातावरण असूनही उकाडा कमी होण्याचे नाव घेत नाही. विशेष म्हणजे, सूर्यास्तानंतरही उष्णतेचा दाह कायम आहे. रात्रीचे तापमान २६ ते २७ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचत असल्याने घरांमध्ये कूलर असूनही नागरिकांना दिलासा मिळत नाही. जमिनीतून बाहेर पडणारी उष्णता आणि गरम वाऱ्यांमुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, पुढील काही दिवस उष्णतेची लाट कायम राहणार असून तापमानाचा पारा ४२ ते ४४ अंशांदरम्यान जाण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर, नागरिकांनी दुपारच्या वेळी अनावश्यक घराबाहेर पडणे टाळावे आणि भरपूर पाणी प्यावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.वाढत्या उष्णतेचा धोका लक्षात घेता, अमळनेर येथील ग्रामीण रुग्णालयात विशेष उष्माघात कक्ष सुरू करण्यात आला आहे.उष्माघाताची लक्षणे जाणवल्यास नागरिकांनी त्वरित वैद्यकीय मदत घ्यावी, अशी सूचना आरोग्य विभागाने केली आहे.




**अमळनेर : वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण रुग्णालयात उभारण्यात आलेला उष्माघात कक्ष. (छायाचित्र : रजनीकांत पाटील)**

## संपादकीय

### वेदनादायक वर्षपूर्ती

भारताशी झालेल्या अनेक युद्धांमध्ये थोबाड फोडून घेतल्यानंतर 'समोरासमोरील युद्धात आपण भारताच्या पासंगालाही पुरणार नाही,' ही बाब पाकिस्तानच्या चांगलीच लक्षात आली आहे. निरपराध पर्यटकांवर अमानुष गोळीबार करून आपले 'ना पाक' मनसुबे रेटण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाकिस्तानपुरस्कृत पहलगाम हल्ल्यांना बुधवारी वर्ष पूर्ण होत आहे. या वर्षभरात जम्मू-काश्मीरमधील सुरक्षा, भारत आणि पाकिस्तान यांच्यातील गोठलेले संबंध आणि महासत्तांचा मानभावीपणा यांचे दर्शन जगाला घडले. दहशतवादाच्या बिनचेहऱ्याच्या शत्रूबरोबर एका अंतहीन लढाईसाठी भारत आपली सज्जता वाढवत आहे, तर दुसरीकडे ' ऑपरेशन सिंदूर'द्वारे भारताने दिलेली चपराक आणि जगभरात झालेली नाचक्की विसरून क्रूरकर्मा पाकिस्तान आंतरराष्ट्रीय पटलावर पुन्हा शांतिदूताचे सोंग आणू पाहत आहे. वर्षपूर्तीच्या निमित्ताने या साऱ्या घटनांची उजळणी करतानाच त्यांच्या वारंवार होणाऱ्या पुनरावृत्तीला लगाम घालण्याचे आव्हान मात्र कायम आहे. भारतविरोधाने पछाडलेल्या पाकिस्तानची वळवळती शेपूट पूर्णपणे ठेचली जाणार नाही, तोवर भारतीयांच्या जखमा भरून येणार नाहीत. त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटल्याप्रमाणे दहशतवादाला तोंड देण्यासाठी अखंड सावधगिरी, योग्य वेळ येताच चोख प्रत्युत्तर आणि दहशतीच्या सूत्रधारांना धडा शिकवणे अशा वेगवेगळ्या आघाड्यांवरील लढाई या 'नवसाधारण' मार्गाने वाटचाल करावी लागेल. लष्करी बळ किंवा आर्थिक विकास अशा आघाडीवर भारताशी बरोबरी करण्याची क्षमता नसलेल्या पाकिस्तानने दहशतीच्या मार्गाने कमरेखाली वार सुरू केले. तीन दशकांपूर्वी मुंबईत झालेल्या स्फोटांपासून सुरू झालेल्या भ्याड हल्ल्यांमध्ये निरपराध नागरिकांना लक्ष्य करण्यात येत आहे. जम्मू-काश्मीरसाठीचे घटनेतील ३७० वे कलम रद्द करण्यात आले. त्यानंतर तेथील विधानसभेच्या निवडणुकीत नागरिकांनी भरघोस मतदान करून भारतीय लोकशाहीवर विश्वास व्यक्त केला; तसेच विक्रमी संख्येने तेथे पर्यटक दाखल होऊ लागले.

दुसरीकडे पाकिस्तानशी कोणतीही चर्चा न करता अनुल्लेखाने मारणे आणि आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर त्याला एकटे पाडण्याचे धोरण भारताने स्वीकारले. त्यातून तेथील सत्ताधाऱ्यांच्या भाषेतील 'दुखरी नस' अधिकच दुखावल्याने अस्वस्थ झालेल्या पाकिस्तानने लक्ष वेधून घेण्यासाठी पहलगाम हल्ला घडवल्याचे जगासमोर आले आहे. तेथे सहकुटुंब आनंद साजरा करीत असलेल्या नागरिकांवर अमानुष गोळीबार करून क्रौर्याचा कळस गाठण्यात आला. भारतीय संरक्षण दलांनी ' लष्कर ए तैयबा ', 'जैश ए महंमद' या दहशतवादी संघटनांचे पाकिस्तानातील तळ उद्ध्वस्त करून योग्य तो इशारा दिला. प्रत्युत्तरादाखल चीन आणि तुर्कीयेचे ड्रोन उडवण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न केविलवाणा ठरला आणि अल्प काळातच त्याने शस्त्रसंधीचे पांढरे निशाण उंचावले. भारतानेही 'आपली लढाई दहशतवादाशी आहे,' या विचारपूर्वक घेतलेल्या भूमिकेवर ठाम राहून संयमाचे दर्शन घडवले आणि 'दुःसाहस केल्यास मोठी किंमत मोजावी लागेल,' असा इशाराही कृतीतून दिला. याच काळात अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भारतीय विमान पडल्याच्या किंवा संघर्षात मध्यस्थी केल्याच्या दाव्यांवरही भारताने संयमित प्रतिक्रिया दिली. अर्थात, वारंवार झालेल्या मुखभंगातून धडा घेईल, तो पाकिस्तान कसला? 'ऑपरेशन सिंदूर'चा कथित सूड घेण्यासाठी दहशतीला खतपाणी घालण्याचे त्याचे प्रयत्न सुरूच राहणार असल्याचे दिल्लीतील स्फोट आणि त्यामागील 'फरिदाबाद रॅकेट'मधून उघड झाले आहे.

पहलगाम हल्ल्यातील दहशतवादी कोठून आले, बैसरन व्हॅलीमध्ये पुरेशी सुरक्षाव्यवस्था का नव्हती, असे काही प्रश्न अजूनही अनुत्तरित आहेत; तसेच या घटनेतील काही आरोपी मारले गेले असले, तरी सूत्रधार अजूनही पाकिस्तानात फिरत असल्याचेही उघड झाले आहे. या घटनेनंतर भारत आणि पाकिस्तानातील संबंध गोठले गेले आहेत; मात्र पाकिस्तानी राज्यकर्ते या ना त्या मार्गाने अमेरिकेच्या मांडीवर बसण्याचा प्रयत्न करीत आहेत. इराणसारख्या देशाची संस्कृती नष्ट करण्याची अमानवी भाषा करताना शांततेचे नोबेलही हवे असलेल्या ट्रम्प यांना पाकिस्तानी फील्ड मार्शल आसिम मुनीर यांच्या प्रेमाचे भरते आले आहे. दहशतीचे नंदनवन बनलेला पाकिस्तान कधी इराण युद्धात मध्यस्थी करून, तर कधी अण्वस्त्रे सौदी अरेबियाच्या चरणी सादर करून आपल्या कंगाल अर्थव्यवस्थेत डॉलरचा प्राणवायू भरण्याचा प्रयत्न करीत आहे. आपला स्वार्थ, हेच प्राधान्य असलेल्या नव्या जगाचे काही धडे भारतालाही वर्षभरात मिळाले आहेत. त्यामुळेच सावधगिरी बाळगून कडेकोट सुरक्षा व्यवस्था उभारणे, जम्मू-काश्मीरच्या विकासाला गती देऊन नागरिकांना मुख्य प्रवाहात आणणे, दहशतवादाविरोधात जागतिक दबाव आणि नव्या पिढीतील कट्टरतावाद रोखणे, अशी पावले टाकावी लागतील.

# तासखेडे येथे भूमी पूजन व सुपोषण जनजागृती

## शेतकऱ्यांमध्ये आणि ग्रामस्थांमध्ये शेतीसोबतच आरोग्यविषयक जाणीवजागृती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अक्षय कृषी परिवार मंगळग्रह सेवा संस्था आणि तालुका कृषी विभाग, अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दिनांक २६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ८.१५ वाजता अमळनेर तालुक्यातील तासखेडे येथे भूमी पूजन सोहळा आणि सुपोषण जनजागृतीपर कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले.या कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवर महिलांच्या हस्ते भूमी पूजनाने करण्यात आली.

या कार्यक्रमाला सरपंच आमोदे सौ.रजनी ताई सुरेश पाटील, सरपंच तासखेडा सौ. कल्पनाताई पाटील, उपसरपंच तासखेडा सौ. वर्षाताई गोरख पाटील, माजी सरपंच तासखेडा सौ. लताबाई नाना ठाकूर,माजी सरपंच तासखेडा श्री.प्रदीप संतोष पाटील,माजी सरपंच तासखेडा श्री.संतोष अर्जुन पाटील,उपकृषी अधिकारी श्री. योगेश वंजारी व आत्मा तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक भूषण पाटील, मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष श्री एस एन पाटील,सचिव श्री सुरेश बाविस्कर, सहसचिव श्री दिलीप बहिरम, संस्थेचे ग्रीनरी कन्सल्टंट सुबोध पाटील उपस्थित होते.




*अमळनेर : तासखेडे येथे आयोजित भूमी पूजन व सुपोषण जनजागृती कार्यक्रमात बोलताना मंगळग्रह सेवा संस्थेचे सहसचिव दिलीप बहिरम. डावीकडून आमोदेच्या लोकनियुक्त सरपंच सौ. रजनीताई पाटील, तासखेड्याच्या सरपंच सौ. कल्पनाताई पाटील, सौ. वर्षाताई पाटील, संतोष अर्जुन पाटील,उपकृषी अधिकारी, योगेश वंजारी व आत्मा तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक भूषण पाटील, प्रदीप पाटील, मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव सुरेश बाविस्कर*




*अमळनेर : तासखेडे येथे आयोजित भूमी पूजन व सुपोषण जनजागृती कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन करताना मान्यवर.*




*अमळनेर : भूमीसुपोषण कार्यक्रमाचे माती पूजन करताना मान्यवर.*
*(छायाचित्रे : नितेश बारी)*

या भूमी सुपोषण कार्यक्रमातील भूमिपूजन कार्यक्रमासाठी पहिल्यांदाच मोठ्या संख्येने माता-भगिनी उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते भूमिपूजन सोहळ्याचे पूजन करण्यात आले. यावेळी अभिमंत्रित केलेली माती शेतकऱ्यांना वाटप करण्यात आली.

या भूमिपूजन कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने आमोदे व तासखेडा येथील महिला उपस्थित होत्या. त्यात श्रीमती.योगिता गुणवंत पाटील, श्रीमती. ललिता रवींद्र पाटील, श्रीमती. पुष्पाबाई चुडामन पाटील,श्रीमती. छोट्याबाई मुकुंदा पाटील, श्रीमती.अनिता गोपीचंद पाटील, श्रीमती. कोकिळा प्रकाश पाटील, श्रीमती. पुंजाबाई नथू पाटील यांनी कार्यक्रमात उस्फुर्त सहभाग घेतला. सोबत आमोदे व तासखेडा गावातील गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते त्यात श्री. देविदास नारायण पाटील, श्री.धीवराज गोबा पाटील, श्री. भैय्या गुलाब पाटील, श्री. दाजीबा काशिराम पाटील, श्री. भाऊसाहेब निळकंठ पाटील, श्री. साहेबराव वामन पाटील, श्री. भैय्यासाहेब अर्जुन पाटील, श्री.शालिक आत्माराम पाटील, श्री. नाना ओंकार पाटील, श्री. सुनील ओंकार पाटील, श्री. सुरेश ओंकार पाटील, श्री. गुणवंत बाबुराव पाटील, श्री. आत्माराम भिका पाटील, श्री. निंबाळ नागो पाटील, श्री. काशिनाथ प्रेमराज पाटील, श्री. परशुराम महादू ठाकूर, श्री. दगा चैत्राम पाटील, श्री. रमेश शामराव पाटील, श्री. गोपीचंद रोमन पाटील, श्री. सुनील पंडित पाटील, श्री. विश्वास विनायक पाटील, श्री. गोरख रंगराव पाटील, श्री. प्रमोद अशोक पाटील, श्री. मुकुंदा नथू पाटील, श्री. निंबा तापीराम पाटील, श्री. उमेश भैय्यासाहेब पाटील, श्री.भरत सुका पाटील, श्री. भाऊसाहेब जयराम पाटील उपस्थित होते. यावेळी शेती विकासाचे महत्त्व आणि शाश्वत शेती पद्धतीचा अवलंब करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सुपोषण जनजागृतीवर भर देण्यात आला. आरोग्यदायी आहार, सकस अन्नाचे महत्त्व आणि ग्रामीण भागातील कुपोषण निर्मूलनासाठी घ्यावयाची काळजी या विषयांवर तज्ज्ञांनी उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये आणि ग्रामस्थांमध्ये शेतीसोबतच आरोग्यविषयक जाणीवजागृती निर्माण झाली आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अक्षय कृषी परिवार मंगळग्रह सेवा संस्था आणि तालुका कृषी विभागाच्या अधिकारी व शुभम् शिसोदे, गोरख पाटील, राजेंद्र पाटील, भूषण पाटील, उज्वल अहिरराव, नरेश लोहेरे, मनोहर तायडे आदी कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिलांच्या स्वावलंबनाला नवे बळ

## जळगाव जिल्ह्यात ९ कोटींच्या निधीतून ३१ बचत गट भवन उभारणार!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव जिल्ह्यात ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी एक महत्त्वपूर्ण आणि दूरदृष्टीचा निर्णय घेत ३१ ठिकाणी महिला बचत गट भवन (प्रभाग संघ इमारत) उभारण्यास मंजुरी देण्यात आली आहे.




जिल्हा वार्षिक योजना (डीपीडीसी) अंतर्गत मंजूर झालेल्या या उपक्रमासाठी सुमारे ९ कोटी ३० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे महिला बचत गटांना प्रथमच स्वतंत्र, सुसज्ज आणि कायमस्वरूपी व्यासपीठ मिळणार आहे.

पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचा पुढाकार बचत गट भवन उभारण्याच्या निर्णयामागे महत्त्वाचा ठरला असून, मंत्री गिरीश महाजन तसेच रक्षा खडसे, संजय सावकारे, खासदार स्मिता वाघ आणि जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींच्या सहकार्यामुळे ही योजना साकारणार आहे. महिलांना केवळ योजनांचे लाभार्थी न ठेवता निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभागी करून घेण्याचा शासनाचा स्पष्ट हेतू या निर्णयातून दिसून येतो. या भवनांमुळे महिला बचत गटांच्या कार्याला नवी गती मिळणार आहे.

बैठका घेण्यासाठी स्वतंत्र जागा, विविध कौशल्यविकास प्रशिक्षण कार्यक्रम, लघुउद्योगांसाठी मार्गदर्शन, उत्पादनांची प्रदर्शने तसेच विपणनासाठी आवश्यक सुविधा या केंद्रांमधून उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी ठोस आधार मिळेल. ग्रामीण महिलांमध्ये नेतृत्व गुण, संघटन कौशल्य आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी ही भवने महत्त्वाची भूमिका बजावतील.

**प्रत्येकी ३० लाख रुपये खर्च अपेक्षित**

गुलाबराव पाटील यांनी याबाबत बोलताना सांगितले की, महिलांना सक्षम करणे म्हणजे समाजाला सक्षम करणे होय. त्यांच्या प्रगतीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारणे ही शासनाची जबाबदारी आहे आणि त्यादृष्टीने हा उपक्रम एक मोठे पाऊल आहे. जिल्ह्यातील जळगाव, धरणगाव, अमळनेर, एरंडोल, भडगाव, भुसावळ, बोदवड, चोपडा, जामनेर, मुक्ताईनगर, पारोळा, पाचोरा, रावेर आणि यावल या तालुक्यांतील विविध गावांमध्ये ही भवने उभारली जाणार आहेत. प्रत्येक तालुक्यातील निवडक गावांचा समावेश त्यात करण्यात आला असून, स्थानिक महिला बचत गटांच्या गरजा लक्षात घेऊन संबंधित ठिकाणांची निवड करण्यात आली आहे. प्रत्येक बचत गट भवनासाठी सुमारे ३० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

या प्रकल्पामुळे महिला बचत गटांना केवळ कार्यासाठी जागाच मिळणार नाही, तर त्यांच्या आर्थिक उपक्रमांना बाजारपेठेशी जोडण्यासही मदत होणार आहे. स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील, स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन मिळेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. एकूणच, सक्षमीकरणाचा पाया- स्वतःचे भवन ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवणारा हा निर्णय ठरला आहे. जिल्ह्यातील महिलांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्याची क्षमता या योजनेत आहे. ग्रामीण भागातील महिलांना स्वाभिमानाने उभे राहण्यासाठी आणि स्वतःच्या प्रगतीचा मार्ग तयार करण्यासाठी हे भवन एक प्रभावी माध्यम ठरणार आहे.

**या गावांना बचत गट भवन**

जळगाव तालुका- भादली बुद्रुक, वावडदे, शिरसोली प्र.न; धरणगाव तालुका- पाळधी खुर्द, बांभोरी प्र.चा., रोटवद; अमळनेर तालुका- गडखांब, ढेकू, मंगरुळ; एरंडोल तालुका- निपाणे, रवंजे; भडगाव तालुका- कोळगाव; भुसावळ तालुका- कुऱ्हे प्र.न., तळवेल, फेकरी; बोदवड तालुका- ऐनगाव; चोपडा तालुका- अडावद, घोडगाव, चहार्डी; जामनेर तालुका - नेरी दिगर, पाळधी, फत्तेपूर, वाघारी; मुक्ताईनगर तालुका- अंतुर्ली, कुऱ्हे; पारोळा तालुका- देवगाव; पाचोरा तालुका- नांद्रा, पिंपळगाव हरेश्वर; रावेर तालुका- खानापूर, निंभोरा बु.; यावल तालुका- भालोद.

# मंगरूळ-शिरुड रस्ता मृत्यूचा सापळा

## अर्धवट दुरुस्तीवरून प्रशासनावर संताप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील मंगरूळ ते शिरुड दरम्यानचा रस्ता अत्यंत दयनीय अवस्थेत पोहोचला असून नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अवघ्या चार किलोमीटरच्या या मार्गापैकी केवळ दोन किलोमीटरपर्यंतच दुरुस्ती करण्यात आली आहे, तर उर्वरित भाग पूर्णपणे खड्डेमय झाल्याने वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. मंगरूळपासून वळणावरील पुढे शिरुड व कावपिंप्रीकडे जाणारा हा महत्त्वाचा मार्ग असून दररोज दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणावर वाहतूक येथे सुरू असते. पुढे अनेक गावांना जोडणारा हा रस्ता असल्याने त्याचे महत्त्व अधिक आहे. मात्र मंगरूळपासून सुमारे दोन किलोमीटरनंतर रस्त्याची अवस्था पूर्णपणे खालावली असून ठिकठिकाणी मोठे खड्डे, उखडलेले डांबरीकरण आणि धोकादायक पृष्ठभाग यामुळे वाहतूक जीवघेणी बनली आहे.विशेषतः समोरून अवजड वाहने आल्यास दुचाकीस्वारांना रस्त्याच्या कडेला उतरावे लागते. साईड पट्ट्या घसरलेल्या असल्याने आणि उडणाऱ्या धुळीमुळे वाहनांचे संतुलन बिघडून अपघातांचा धोका वाढला आहे. काही ठिकाणी रस्त्याच्या मध्यभागी खोल खड्डे असल्याने वाहनांचे नुकसानही होत आहे. भरधाव वाहनांमुळे उडणाऱ्या धुळीचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत असून परिसरातील आरोग्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे.रात्रीच्या वेळी खड्डे न दिसल्याने अपघातांचा धोका अधिकच वाढतो. केवळ अर्धवट दुरुस्ती करून उर्वरित रस्ता का दुर्लक्षित ठेवण्यात आला, असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. पुढील भागात गावे नाहीत का? असा प्रश्नही ग्रामस्थ विचारत आहेत.

अपूर्ण दुरुस्तीमुळे प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत असून संबंधित विभागाने तातडीने संपूर्ण रस्त्याचे दर्जेदार काम हाती घ्यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा या मार्गावर मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त करत संभाव्य दुर्घटनेस प्रशासनच जबाबदार राहील, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

# अकरावी प्रवेश अर्ज भरताना या चुका टाळा

## शिक्षण विभागाच्या सूचना, अन्यथा प्रवेशात येईल अडथळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे. घाईत किंवा चुकीच्या माहितीमुळे प्रवेश प्रक्रियेत अडथळे येऊ शकतात, हे लक्षात घेता विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाने महत्त्वाच्या सूचना जारी केल्या आहेत.प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि गुणवत्तेवर आधारित आहे. त्यामुळे कोणीही प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखवल्यास त्याला बळी पडू नका. विद्यार्थ्यांनी केवळ अधिकृत संकेतस्थळावरच माहिती भरावी.अर्जात एकदा दिलेला मोबाईल नंबर आणि ईमेल आयडी बदलू नका, कारण सर्व महत्त्वाचे ओटीपी याच क्रमांकावर येणार आहेत.अर्ज सेव्ह केल्यानंतर त्यात बदल करणे कठीण असते. माहिती चुकीची भरली गेल्यास, तो अर्ज दुरुस्त करण्याऐवजी थेट डिलिट करून नव्याने भरण्याची वेळ येऊ शकते.पेमेंट फेल झाल्यास पुन्हा पैसे भरण्यापूर्वी २४ तास वाट पाहा आणि बँकेचे स्टेटस तपासा.आपला पासवर्ड कोणाशीही शेअर करू नका. राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी सर्व आवश्यक प्रमाणपत्रे (जात प्रमाणपत्र, नॉन-क्रिमीलेयर) वैध असल्याची खात्री करूनच अपलोड करावीत.निकाल जाहीर झाल्यानंतर अर्ज लॉक करणे अनिवार्य आहे. जोपर्यंत अर्ज लॉक होत नाही, तोपर्यंत विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेत सहभागी मानले जाणार नाहीत.विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी या सूचनांचे पालन करून विनासायास प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

# भारतात गौमाता राष्ट्र माता घोषित करा

## भव्य गौसन्मान रॅली, असंख्य गोसेवकांचा सहभाग, हजारो गोसेवकांच्या सह्यांचे दिले निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेरः-गौमतेला तिचा सन्मान मिळवून देण्यासाठी गौसन्मान आव्हान अभियान अंतर्गत गौसन्मान रॅली काल सोमवारी दिनांक २७ एप्रिल रोजी अमळनेर शहरात हिंदू समाजाचे साधू व संत यांच्यासह शेकडो गोसेवकांच्या उपस्थितीत पार पडली.गौमाता राष्ट्र माता घोषित करा या मागणीचे हजारो गोसेवकांच्या सह्या असलेले निवेदन प्रशासनाच्या वतीने भारताचे पंतप्रधान व राष्ट्रपतींना देण्यात आले.

गौसन्मान आवाहन अभियान तर्फे या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.सकल हिंदू समाजाचे शेकडो गोसेवक यावेळी उपस्थित झाले होते.भजनी मंडळ व महिला मंडळ देखील सहभागी झाले होते.सकाळी १० वाजता संकटमोचन हनुमान मंदिर,प्रताप मिल कपाउंड येथुन रॅलीस सुरुवात होऊन तहसील ऑफिस,अमळनेर येथे पोहोचली.यावेळी साधू संतांनी मनोगत व्यक्त करून गोमतेचे महत्व विशद केले.यानंतर तहसीलदारांना हजारो गोसेवकांच्या सह्यांचे निवेदन देण्यात आले.

निवेदनात गो हत्या बंदीचा एक देश, एकच कडक कायदा करून गौमाता राष्ट्र माता घोषित करावी, केंद्रीय गोसेवा आणि संरक्षण कायदा' लागू करावा.सर्व कत्तलखान्यांचे परवाने रद्द करावे,स्वतंत्र केंद्रीय गौ मंत्रालय स्थापन करावे

यासह अन्य मागण्या करण्यात आल्या. गौमतेवर अपार श्रद्धा ठेवणाऱ्या हिंदू बंधू भगिनींनी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती दिली.



*अमळनेर : गौसन्मान रॅलीमध्ये सहभागी झालेले गोसेवक.*

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com




## जागतिक सुरक्षितता आणि आरोग्य दिन विशेष

# सुरक्षित कार्यस्थळासाठी सामूहिक बांधिलकी



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी २८ एप्रिल रोजी 'जागतिक सुरक्षितता आणि आरोग्य दिन' साजरा केला जातो. या दिनाचा उद्देश कामाच्या ठिकाणी होणारे अपघात, आजार आणि जीवितहानी कमी करण्यासाठी जागरूकता निर्माण करणे हा आहे. औद्योगिकीकरणाच्या वाढत्या गतीमुळे आणि बदलत्या कामाच्या पद्धतींमुळे कामगारांच्या आरोग्य व सुरक्षिततेसंदर्भातील प्रश्न अधिकच गंभीर होत आहेत. त्यामुळे या दिवसाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.

### सुरक्षितता आणि आरोग्य का महत्त्वाचे?

कामगार हा कोणत्याही उद्योगाचा कणा असतो. सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरणात काम केल्यास कामगारांची उत्पादकता वाढते, अनुपस्थिती कमी होते आणि उद्योगाची एकूण प्रगती साध्य होते. उलट, असुरक्षित वातावरणामुळे अपघात, मानसिक ताण, व्यावसायिक आजार आणि आर्थिक नुकसान होऊ शकते.

### भारतातील परिस्थिती

भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर कामगार अनौपचारिक क्षेत्रात कार्यरत आहेत. या क्षेत्रात सुरक्षा उपाययोजनांची कमतरता, प्रशिक्षणाचा अभाव आणि आरोग्य सुविधा अपुऱ्या असल्याने अपघातांचे प्रमाण अधिक आहे. बांधकाम, खाणकाम, कारखाने आणि रासायनिक उद्योगांमध्ये विशेषतः धोके अधिक असतात. त्यामुळे शासन आणि उद्योगांनी एकत्र येऊन कडक नियमांची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

### प्रमुख आव्हाने

- सुरक्षा नियमांचे पालन न होणे
- योग्य प्रशिक्षणाचा अभाव
- संरक्षणात्मक साधनांची कमतरता (पीपीई)
- मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष
- अतिरिक्त कामाचा ताण आणि वेळेचे बंधन
- उपाययोजना आणि दिशा

सुरक्षित कार्यसंस्कृती निर्माण करण्यासाठी पुढील बाबी महत्त्वाच्या आहेत.

**सुरक्षा प्रशिक्षण :** कामगारांना नियमितपणे सुरक्षा प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

**आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर :** ऑटोमेशन, सेन्सर आणि 'एआय'चा वापर करून धोके ओळखता येतात.

**कडक कायदे आणि अंमलबजावणी :** कामगार कायद्यांचे पालन आणि निरीक्षण वाढविणे गरजेचे आहे.

**मानसिक आरोग्याची काळजी :** कामगारांच्या मानसिक ताणावर लक्ष देणे आणि समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देणे.

**संवाद आणि सहभाग :** व्यवस्थापन आणि कामगार यांच्यात खुला संवाद असणे आवश्यक आहे.

### कोविड-१९ नंतरचे बदल

कोविड-१९ महामारीनंतर कार्यस्थळाच्या सुरक्षिततेबद्दलची जाणीव अधिक वाढली आहे. स्वच्छता, सामाजिक अंतर, आरोग्य तपासणी आणि लवचिक काम पद्धती यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. 'वर्क फ्रॉम होम' पद्धतीमुळे मानसिक आरोग्य आणि काम-जीवन समतोल यावर नवीन चर्चा सुरू झाली आहे. 'जागतिक सुरक्षितता आणि आरोग्य दिन' हा केवळ एक दिवस साजरा करण्यापुरता मर्यादित नसून, ती सतत चालणारी प्रक्रिया आहे. सुरक्षित कार्यस्थळ ही प्रत्येक कामगाराची मूलभूत गरज आणि हक्क आहे. शासन, उद्योग आणि कामगार यांनी एकत्र येऊन सुरक्षिततेची संस्कृती रुजविली तरच अपघातमुक्त आणि आरोग्यपूर्ण समाजाची निर्मिती शक्य होईल. सुरक्षितता ही निवड नसून गरज आहेआणि ती प्रत्येकाने प्राधान्याने स्वीकारली पाहिजे.

# आई-वडिलांच्या हातांचे लेकीने केले चीज; थेट गाठले मंत्रालय!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सक्सेस स्टोरी

वडील सेंट्रिंग कामगार आणि आई शेतमजूर. मात्र, मुलीने मोठे स्वप्न पाहिलेले. त्यासाठी वाटेल ते कष्ट करायची तिची तयारी होती. तिने अनेक अडचणींचा सामना करत तासन्तास अभ्यास केला. तिच्या जिद्द आणि मेहनतीपुढे यशाला देखील एकटे येता आले नाही. तर एकाच वेळी दुहेरी स्वरूपात यावे लागले. कोल्हापूरच्या गरिबा घरची मुलगी 'मंत्रालय क्लार्क' आणि 'महसूल सहायक' अशा दोन्ही परीक्षा उत्तीर्ण झाली आहे.

कोल्हापुरातील वडणगेच्या अस्मिता भगवान लांडगे हिची ही कहाणी आहे. कुटुंबाची आर्थिक भिस्त ही केवळ शारीरिक कष्टावर आहे. वडील सेंट्रिंगची कामे करतात, तर आई शेतमजुरी करून घरखर्चाला हातभार लावते. अशा घरात वाढलेल्या अस्मिताने स्पर्धा परीक्षेतून अधिकारी होण्याचे स्वप्न पाहिले. या स्वप्नाचा पाया तिने जिद्द आणि मेहनतीनेच उभारला.

अस्मिताचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण गावातील पार्वती हायस्कूलमध्ये झाले. त्यानंतर महावीर महाविद्यालयात पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले. याच काळात स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. तीन वर्षांपासून ती सतत अभ्यास करत होती. घरची परिस्थिती बेताची असल्याने तिने महागड्या कोचिंगशिवाय पुढे जाण्याचा निर्णय घेतला.

अवघ्या दोन खोल्यांच्या घरात राहून अस्मिताने जिद्दीने अभ्यास केला. हे करताना तिला फक्त तिचे स्वप्न दिसत होते. त्यासाठी तिने सण, उत्सव अशा आनंदाच्या क्षणांचा देखील त्याग केला. अखेर या कष्टाचे आणि मेहनतीचे दुहेरी फळ तिला मिळाले आहे. सर्व अडचणींवर मात करत ती एकाच वेळी मंत्रालय क्लार्क आणि महसूल सहायक या दोन्ही परीक्षांत उत्तीर्ण झाली.



# अपराजित पराक्रमाचे शिल्पकार : थोरले बाजीराव पेशवे



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

स्मृतिदिन विशेष

मराठा साम्राज्याच्या इतिहासात अजरामर ठरलेले पराक्रमी सेनानी आणि दूरदृष्टीचे नेतृत्व म्हणजे बाजीराव प्रथम. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या अद्वितीय कार्याचा आणि पराक्रमाचा आढावा घेणे म्हणजे भारतीय इतिहासातील एका सुवर्णपानाचे स्मरण होय.

### प्रारंभिक जीवन आणि जबाबदारी

इ.स. १७२० मध्ये केवळ २० व्या वर्षी बाजीराव पेशवेपदी विराजमान झाले. त्यांचे वडील बालाजी विश्वनाथ हेही एक कुशल मुत्सद्दी होते. वडिलांकडून मिळालेल्या राजकारण आणि युद्धनीतीच्या धड्यांमुळे बाजीरावांनी अल्पावधीतच आपली छाप पाडली.

### लढाऊ धोरण आणि विजयगाथा

बाजीराव पेशवे हे जलद गतीने हालचाल करणाऱ्या घोडदळासाठी प्रसिद्ध होते. 'शत्रूला थेट भिडा आणि वेगाने प्रहार करा' ही त्यांची युद्धनीती होती. त्यांनी अनेक मोहिमा यशस्वीरीत्या पार पाडत मराठा साम्राज्याचा विस्तार उत्तर भारतापर्यंत नेला. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी एकही युद्ध हरले नाही, ही बाब त्यांच्या पराक्रमाची साक्ष देते. दिल्लीवर मराठ्यांचा प्रभाव प्रस्थापित करण्यात त्यांचे योगदान मोलाचे आहे.

**राजकीय दूरदृष्टी :** बाजीराव पेशवे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर ते कुशल राजकारणीही होते. त्यांनी मराठा साम्राज्याला एकत्र ठेवण्याचे आणि त्याचा विस्तार करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. छत्रपती शाहू महाराज यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी विश्वासू आणि निष्ठावान सहकारी म्हणून काम केले.

**वैयक्तिक जीवन :** बाजीराव आणि मस्तानी यांची प्रेमकहाणी इतिहासात विशेष चर्चेचा विषय राहिली आहे. सामाजिक आणि राजकीय विरोधाला सामोरे जात त्यांनी आपल्या नात्याला जपले. ही कथा त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील मानवी बाजूही अधोरेखित करते.

**स्मृतिदिनाचे महत्त्व :** २८ एप्रिल १७४० रोजी बाजीराव पेशव्यांचे निधन झाले. त्यांचा स्मृतिदिन हा त्यांच्या पराक्रमाची, नेतृत्वाची आणि राष्ट्रनिष्ठेची आठवण करून देतो. थोरले बाजीराव पेशवे हे केवळ एक योद्धे नव्हते, तर ते मराठा साम्राज्याच्या विस्ताराचे शिल्पकार होते.

# जास्त पाणी असलेले नारळ कसे ओळखाल?

## नारळ विक्रेत्याने सांगितले गुपित; आपले पैसे होतील वसूल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नारळात जास्त पाणी कसे ओळखावे? नारळ विक्रेत्याने सांगितलेल्या या ५ सोप्या टिप्स फॉलो करा आणि उन्हाळ्यात मिळवा भरपूर ताजे नारळ पाणी. फसवणूक टाळण्यासाठी नक्की वाचा.

उन्हाळ्याच्या दिवसात नारळ पाणी प्यायल्याने शरीराला थंडावा आणि ऊर्जा मिळते. पण बऱ्याचदा आपण बाजारात जाऊन मोठा नारळ विकत घेतो आणि घरी फोडल्यावर त्यात खूप कमी पाणी निघते, असे झाल्यावर आपला हिरमोड होतो. पण आता काळजी करू नका. एका अनुभवी नारळ विक्रेत्याने नारळात पाणी जास्त आहे की नाही, हे ओळखण्याचे काही सोपे मार्ग सांगितले आहेत. याचा अवलंब करून तुम्ही नारळात पाणी जास्त आहे की नाही, हे ओळखू शकता.

नारळ खरेदी करताना साधारण ५ गोष्टींकडे लक्ष देणे फार गरजेचे असते. ज्यामुळे फसवणूक होणार नाही. अनेकांना वाटते की मोठा नारळ म्हणजे जास्त पाणी. पण हे चुकीचे आहे. मोठ्या नारळात अनेकदा मलई जास्त असते आणि पाणी कमी असते. त्यामुळे नेहमी मध्यम आकाराचा नारळ निवडा.

नारळ कानाजवळ धरून हलवून पाहा. जर त्यातून पाण्याचा खूप मोठा आवाज येत असेल, तर तो नारळ घेऊ नका. त्या नारळात पाणी कमी आणि हवा जास्त आहे. जर नारळ हलवताना आवाज येत नसेल किंवा खूप कमी आवाज येत असेल, तर तो नारळ पाण्याने पूर्ण भरलेला आहे असे समजावे.



नारळ पाणी घेण्यापूर्वी त्याचा आकार बघणे खूप महत्त्वाचे आहे. जर नारळ वरून त्रिकोणी दिसत असेल, तर तो आतून पोकळ असण्याची शक्यता असते. त्याऐवजी गोल किंवा अंडाकृती आकाराचे नारळ घ्यावेत. त्यात पाणी जास्त असते.

बाजारात दोन नारळ सारख्या आकाराचे दिसत असतील, तर ते हातात घेऊन वजन तपासा. जो नारळ वजनाला जास्त जड वाटेल, तोच निवडा. वजन जास्त असणे हे नारळ पाण्याने भरलेले असल्याचे संकेत असतात.

नारळाच्या वरच्या टोकाला जेथे देठ असतो तेथे बघा. जर तेथे खोल खड्डा असेल आणि आजूबाजूला हिरवा रंग असेल, तर तो नारळ ताजा आहे. मात्र, जर तेथे काळे डाग किंवा छिद्र दिसत असेल, तर तो नारळ आतून खराब किंवा सडलेला असू शकतो. त्यामुळे पुढच्या वेळी नारळ विकत घेताना व्यापाऱ्याने दिलेल्या या सोप्या टिप्स नक्की वापरून पाहा. यामुळे तुमचे पैसे सार्थकी लागतील. तुम्हाला तहान भागवण्यासाठी पुरेसे नारळ पाणी मिळेल.

# पाकिस्तानची भारताने लावली पार वाट

## भिकेला लागला पाक, थेट मोठा निर्णय, १०० टक्के...


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारताने पार पाकिस्तानची वाट लावून टाकली आहे. पाकिस्तानला पळता भुई कमी केली. पहलगाममध्ये हल्ला करून पाकिस्तानने मोठी चूक केली. पाकिस्तानची आर्थिक स्थिती जगापासून लपून राहू शकली नाही. पाकिस्तानचे तीनतेरा वाजले आहेत. त्यामध्येच आता भारताने पाण्यासाठीही पाकिस्तानला मोतल केले. पहलगामवरील हल्ल्यानंतर भारताने सिंधु जल करार बंद केला. तो मोठा धक्का असतानाच एका मागून एक धक्के पाकिस्तानला दिली जात आहेत. रावी नदीच्या पाण्यावर आता १०० टक्के भारताचे नियंत्रण आहे. सिंधू जल करार भारताने स्थगित केल्याने आंतरराष्ट्रीय पातळीवरून भारतावर दबाव आणण्याचे काम पाकिस्तानने केले. भारताने आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरही पाकिस्तानची पार इज्जत काढली. त्यातच सिंधू नदीच्या पाण्यासोबतच इतर नद्यांच्याही पाण्यावर भारत आपले नियंत्रण मिळवत आहे. त्यामुळे पाकिस्तानवरील दबाव वाढत आहे. सिंधू नदीसोबतच रावी, सतलूज आणि ब्यास या नद्यांचे २० टक्के पाणी पाकिस्तानला मिळत होते. आता भारताने सिंधू नदीचे पाणी रोखले आहे. यासोबतच धरणांची क्षमता वाढवली जात आहे. ज्या माध्यमातून जल वीजनिर्मिती मोठ्या प्रमाणात केली जात आहे. जम्मू- काश्मीर सरकारने सिंधू, झेलम आणि चिनाबवर काम सुरू केले आहे. ज्यामुळे पाकिस्तानमध्ये येथून जाणारे ८० टक्के पाणी कमी झाले. तशी येथे वीजनिर्मिती जास्त केली जाणार नाही. पण पाणी रोखले जाते आहे. पंजाब आणि जम्मू काश्मीरच्या सीमेवर बनलेले शाहपूर कंडी बंधारा पूर्ण झाल्यानंतर रावी नदीच्या पाण्यावर भारताचे नियंत्रण असेल. हेच नाही तर हे पाणी सांबा आणि कठुआकडे वळविण्यात येईल. भारत फक्त बोलत नाही, तर डोक्याने पाकिस्तानचा गेम करत आहे. भारताने घेतलेल्या या निर्णयाने पाकिस्तानची पार वाट लागली. भारतासोबत पंगा घेतल्याने पार पाण्यासाठी तडफण्याची वेळ पाकिस्तानवर आली आहे.

# मराठी साहित्यविश्वातील तेजस्वी व्यक्तिमत्त्व : मधु मंगेश कर्णिक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जन्मदिन विशेष



मराठी साहित्याच्या समृद्ध परंपरेत आपले वेगळे स्थान निर्माण करणारे ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांचा जन्मदिन हा साहित्यप्रेमींसाठी प्रेरणादायी ठरतो. त्यांच्या लेखनातून ग्रामीण जीवन, कोकणातील संस्कृती, मानवी नातेसंबंध आणि सामाजिक वास्तव यांचे अत्यंत जीवंत आणि प्रभावी चित्रण दिसून येते.

### प्रारंभिक जीवन आणि पार्श्वभूमी

मधु मंगेश कर्णिक यांचा जन्म कोकणातील निसर्गरम्य वातावरणात झाला. या प्रदेशातील जीवनशैली, परंपरा आणि लोकजीवनाचा त्यांच्या मनावर खोल प्रभाव पडला. याच अनुभवसंपन्नतेतून त्यांच्या लेखनाची पायाभरणी झाली. साध्या, माणुसकीने भरलेल्या जीवनाचा त्यांनी जवळून घेतलेला अनुभव त्यांच्या साहित्याला वास्तववादी आणि स्पर्शून जाणारा बनवतो.

### साहित्यसंपदा आणि वैशिष्ट्ये

कर्णिक यांनी कादंबरी, कथा, निबंध, आत्मकथन अशा विविध साहित्यप्रकारांमध्ये विपुल लेखन केले. त्यांच्या साहित्याची काही ठळक वैशिष्ट्ये अशी आहेत.

ग्रामीण जीवनाचे वास्तववादी चित्रण : कोकणातील जीवन, संघर्ष आणि सौंदर्य यांचे त्यांनी प्रभावी वर्णन केले.

मानवी भावनांची सूक्ष्म जाण : त्यांच्या कथांमध्ये नातेसंबंधातील गुंतागुंत आणि भावविश्वाचे बारकावे दिसतात.

सामाजिक भान : समाजातील बदल, विषमता आणि समस्यांवर त्यांनी संवेदनशीलतेने भाष्य केले.

सोपे आणि प्रभावी लेखनशैली : वाचकांशी थेट संवाद साधणारी, सहज आणि ओघवती भाषा ही त्यांच्या लेखनाची ताकद आहे.

### योगदान आणि प्रभाव

मधु मंगेश कर्णिक यांनी मराठी साहित्याला केवळ समृद्ध केले नाही, तर वाचकांच्या मनात विचारांची नवी दिशा निर्माण केली. त्यांच्या लेखनातून माणुसकी, संवेदनशीलता आणि सामाजिक जाणीव यांचे महत्त्व अधोरेखित होते. नवोदित लेखकांसाठी ते प्रेरणास्थान ठरले आहेत.

### पुरस्कार आणि गौरव

त्यांच्या साहित्यिक कार्यासाठी त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. हे पुरस्कार त्यांच्या प्रतिभेची आणि साहित्य क्षेत्रातील योगदानाची साक्ष देतात. मात्र, त्यांच्या दृष्टीने वाचकांचे प्रेम आणि प्रतिसाद हेच सर्वात मोठे पारितोषिक राहिले आहे.

### आजच्या काळातील महत्त्व

आजच्या वेगवान आणि तंत्रज्ञानप्रधान युगातही कर्णिक यांचे साहित्य आपल्याला माणुसकीची आठवण करून देते. त्यांच्या कथांमधून आपण आपल्या मुळांकडे, संस्कृतीकडे आणि नातेसंबंधांकडे नव्या दृष्टीने पाहायला शिकतो. मधु मंगेश कर्णिक यांचा जन्मदिन हा त्यांच्या साहित्यसंपदेचा आणि विचारांचा पुनःस्मरण करण्याचा दिवस आहे. त्यांच्या लेखनातून मिळणारे जीवनमूल्ये आणि प्रेरणा पुढील पिढ्यांसाठीही मार्गदर्शक ठरतील. मराठी साहित्यविश्वातील हा तेजस्वी दीप पुढील अनेक वर्षे वाचकांच्या मनात प्रकाश देत राहील, यात शंका नाही.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे





# वैशाख महिना : गंधलेपन अन् गोपाळ स्वामींच्या पुण्यस्मरणाने शीतले

## भगवान श्रीनृसिंह जयंती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चैत्राचा हात धरून वैशाख येतो. याही महिन्यात श्रीनारदांचा लघुरुद्राभिषेक चालू असतो. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी महापूजेच्या वेळी संपूर्ण गाभाऱ्यातील चौथा आणि श्रीदत्त महाराजांची पदचिन्हे यांना गंधलेपन असते. जवळ-जवळ पंधरा-सोळा शिंपले केशर चंदन उघडलेले असते. गंधलेपन करताना सगळीकडे सुवास- सुवास भरून राहतो. पहाटेपासून श्रीनारायण स्वामींच्या मठात जमिनीलगत बसविलेल्या सहाणेवर हे गंध उघडण्याचे काम पुजारी सेवाभावाने करीत असतात. ही महापूजा रोजपेक्षा जास्त वेळ चालते. संपूर्ण गंधलेपनामुळे ती मनात ठसते ही जास्त. या दिवशी रात्री पालखीच्या वेळी सुद्धा अधिकाधिक पूजारी आपली गायन सेवा श्रीचरणी अर्पण करतात. याच दिवशी शीतलागौरीच्या प्रकारचेही समापन असते. कट्ट्यावर काढलेल्या रांगोळ्या आणि त्यांवर वाहिलेली शमीपत्रे सारा परिसर धार्मिकतेचा प्रत्यय आणून देणारा असतो.

अक्षय्य तृतीयेची सायंकाळ खास महिला वर्गाची देवालयाचा सारा परिसर रंगीबेरंगी प्रवरणांनी अन् विविध अलंकाराने नटलेल्या स्त्रिया, मुलींनी फुलून गेलेला असतो. प्रत्येकीच्या हातातील तबकात हळद-कुंकू, हरभऱ्याची ओटी अन् डाळीची कैरी घालून केलेली कोशिंबीर असते. घरच्या चैत्रागौरीला केलेला हा नैवेद्य श्रीदत्त महाराज, कृष्णा नदी, जान्हवी-अन्नपूर्णा यांनाही दाखवायचा असतो. त्यांचीही हळद-कुंकू लावून ओटी भरायची असते. पूर्वीच्या काळी घरोघरी होणारे चैत्रगौरीचे हळदी-कुंकू आता अशा सार्वजनिक ठिकाणी जास्त सोयीस्कर बनू लागले आहे. कुणालाही आमंत्रण न देता देवांच्या कट्ट्यावर हा समारंभ हसत-खेळत, एकमेकींची चेष्टामस्करी करत, परस्परांची खुशाली विचारत निवांतपणे साजरा केला जात असे. यावेळी नवनवीन साड्या, नवीन अलंकार यातूनच स्त्री सौंदर्याचे सहजच



दर्शन घडते. हळदी-कुंकवाने भरलेले कपाळ सौभाग्याचे सौंदर्य वाढवत असते. हरभऱ्याची ओटी भरभरून येते. प्रत्येकीच्या कोशिंबिरीच्या चवीने पोट भरून जाते. आनंद, उत्साह आणि चैतन्याने भरलेला हा समारंभ अनुभवणे हेही भाग्य.

असाच भाग्यकारक सोहळा पुरुषांनाही अनुभवायला मिळतो. वैशाख शुद्ध चतुर्दशीला वाढीची उपाध्य मंडळी भगवान श्रीनृसिंह जयंती साजरी करतात. त्यावेळी सर्वांना हरभऱ्याच्या डाळीची कोशिंबीर देतात. त्याचबरोबर देवांच्या अंगावरचे गंधही सर्वांच्या अंगाला लावतात. प्रत्येक क्षणातून उत्सवांद्वारे भक्तांचे देवांशी असलेले भक्तीचे नाते अशा प्रथा-पद्धतींनी अधिकच अधिकाधिक दृढच होत जाते.

वैशाख वद्य द्वादशी म्हणजे महान योगी श्री गोपाळ स्वामींची ही पुण्यतिथी. हा दिवस वाडीमध्ये पूजा-अर्चा महाप्रसाद करून साजरा केला जातो. अध्यात्मात ' समाधी प्राप्ती ' ही परिपूर्ण अवस्था मानली जाते. या अवस्थेमध्ये मानवी देहात असलेल्या ईश्वरी चैतन्याशी एकरूप होण्याची प्रक्रिया चालू असते. योगाभ्यास येणे ईश्वरी शक्तीशी तादात्म्य होणे ही समाधी अवस्था असते. महान योगी श्री गोपाळ स्वामी योगाभ्यासामध्ये इतके प्रवीण होते, की योगसाधनेने देहातील अवस्थेमध्ये ते कित्येकदा समाधी लावून बसत असत. त्यांनी पुष्कळ तीर्थयात्रा केल्या; पण शेवटी श्रीदत्त महाराजांच्या सान्निध्यात, त्यांच्या नामस्मरणात, त्यांच्या स्वरूप ध्यानात समाधी लावून बसण्याचे हेतुतः ठरविले. त्यामुळे वाडी शेती स्वतःच्या श्वासोच्छ्वासाच्या गतीवर योगसाधनेने नियंत्रण ठेवत त्यांनी जीवंत समाधी घेतली. श्रीकृष्णानंद स्वामी मंदिराजवळ थोड्या आतल्या बाजूला त्यांची छोटीशी समाधी आहे. जीवंत समाधी असल्याने आतमध्ये महादेवाची पिंडी आहे. त्यावर अश्वत्थ वृक्षाचा पार आहे. येथील एकांत आणि शांतता या थोर योग्याच्या अस्तित्वाची जाणीव करून देतात. येथील भूमीत त्यांच्या देहातीत, उन्मनी अवस्थेत चाललेल्या श्वास स्पंदनांची कंपने लहरत असल्याचा भास होतो. आपल्या मालकीची १६ एकर जमीन श्रींच्या पूजेसाठी, नंदादीपा साठी अर्पण करून या योग्याने आपली श्रीचरणी असलेली तादात्म्य भक्ती प्रकट केलेली आहे. आजही या जमिनीला ' समाधीची जमीन ' असेच म्हणतात. दर बारा वर्षांनी येणाऱ्या कन्यागत पर्वामध्ये तेथे असलेल्या औदुंबर वृक्षाखाली उत्सवमूर्तीची प्रतिष्ठापना करून पूजा-अर्चा केली जाते. असा हा वैशाख महिना. तापत्या उन्हातही पादुकांच्या संपूर्ण गंधलेपनाने अन् गोपाळ स्वामींच्या पुण्य स्मरणाने शीतल झालेला असतो.

## भौम प्रदोष व्रत विशेष

### श्रद्धा, शास्त्र आणि आध्यात्मिक साधनेचा संगम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात व्रत-उपवासांना विशेष महत्त्व दिले जाते. प्रत्येक व्रतामागे केवळ धार्मिक श्रद्धाच नसून त्यामध्ये आरोग्य, मानसिक शांती आणि आध्यात्मिक उन्नती यांचा गूढ संगम दडलेला असतो. अशाच महत्त्वाच्या व्रतांपैकी एक म्हणजे भौम प्रदोष व्रत. मंगळवारी येणाऱ्या प्रदोष व्रताला 'भौम प्रदोष' असे म्हटले जाते. हे व्रत भगवान शंकराच्या उपासनेसाठी अत्यंत फलदायी मानले जाते.

**प्रदोष व्रत म्हणजे काय?**

प्रदोष व्रत हे प्रत्येक महिन्याच्या कृष्ण आणि शुक्ल पक्षातील त्रयोदशी तिथीला केले जाते. 'प्रदोष' म्हणजे सायंकाळचा काळ, विशेषतः सूर्यास्तानंतरचा सुमारे दीड तासांचा कालावधी. या वेळेत भगवान शिव यांची पूजा केल्यास विशेष पुण्य लाभते, असे शास्त्रात सांगितले आहे.

**भौम प्रदोषाचे विशेष महत्त्व**

जेव्हा प्रदोष व्रत मंगळवारी येते तेव्हा त्याला भौम प्रदोष असे म्हणतात. 'भौम' हा शब्द मंगळ ग्रहाशी संबंधित आहे. या दिवशी केलेले व्रत विशेषतः खालील गोष्टींसाठी लाभदायक मानले जाते. कर्जमुक्ती, आरोग्य सुधारणा, विवाहातील अडथळे दूर होणे, संततीप्राप्ती, शत्रूंचा नाश व धैर्यवृद्धी, व्रताची पद्धत, भौम प्रदोष व्रत श्रद्धेने आणि नियमपूर्वक केले जाते. त्याची साधारण पद्धत पुढीलप्रमाणे आहे. सकाळी लवकर उठून स्नान करावे आणि स्वच्छ वस्त्रे परिधान करावीत. दिवसभर उपवास करावा. काहीजण फलाहार घेतात. सायंकाळी प्रदोष काळात भगवान शिव, माता पार्वती आणि नंदी यांची पूजा करावी. शिवलिंगावर बेलपत्र, दूध, पाणी, धतुरा अर्पण करावे. 'ॐ नमः शिवाय' या मंत्राचा जप करावा. शिवआरती करून व्रताची समाप्ती करावी.

**धार्मिक कथा**

भौम प्रदोष व्रताशी संबंधित अनेक पौराणिक कथा प्रचलित आहेत. एका कथेनुसार एका गरीब ब्राह्मणाने हे व्रत निष्ठेने केल्यामुळे त्याचे सर्व संकट दूर झाले आणि त्याला समृद्धी प्राप्त झाली. यावरून या व्रताची फलश्रुती आणि महिमा स्पष्ट होतो.

**वैज्ञानिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोन**

उपवासामुळे शरीराला विश्रांती मिळते आणि पचनसंस्था सुदृढ राहते. तसेच ध्यान, जप आणि पूजा यामुळे मन एकाग्र होते, तणाव कमी होतो आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. प्रदोष काळातील साधना ही मनःशांतीसाठी विशेष उपयुक्त मानली जाते. भौम प्रदोष व्रत हे केवळ धार्मिक विधी नसून जीवनशैलीत शिस्त, संयम आणि श्रद्धा निर्माण करणारे साधन आहे.



## वाराह तीर्थ कैसे बना?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्राचीन समय की बात है, सिंधुसेन नामक एक दैत्य ने देवताओं को परास्त कर यज्ञ छीनकर उसे रसातल में छिपा दिया। यज्ञ के अभाव में देवताओं का बल, ऐश्वर्य और वैभव नष्ट होने लगा। तब उन्होंने भगवान विष्णु से सहायता की प्रार्थना की।

भगवान विष्णु उन्हें सांत्वना देते हुए बोले- 'देवताओ! आप निश्चिंत रहें। मैं वाराह-रूप धारण कर दैत्यों का संहार करूँगा और पुण्यमय यज्ञ को वापस लाऊँगा।' इसके बाद भगवान श्रीविष्णु वाराह-रूप धारण कर भयंकर गर्जना करने लगे। उन्होंने अपने तीव्र गर्जन से ब्रह्मा सहित सभी प्रधान ऋषि-मुनियों के मन में आनन्द की लहरें उत्पन्न कर दीं। दसों दिशाएं उनकी गर्जना से गूँज उठीं। देवताओं ने उस गर्जन को सुना तो उन्होंने ऋग, साम और यजुर्वेद के उत्तम वैदिक स्त्रोतों द्वारा आदिपुरुष भगवान वाराह की स्तुति की।

उनकी स्तुति सुनकर श्रीवाराहरूपी भगवान विष्णु अपनी कृपा-दृष्टि से उन्हें अनुगृहित करके जल में प्रविष्ट हो गए। जिस मार्ग से देवी गंगा रसातल में गई थीं। उसी मार्ग से भगवान वाराह भी रसाताल में पहुँच गए।

तभी सिंधुसेन वहाँ आया। भगवान वाराह को देखकर वह हँसते हुए बोला 'अरे! जंगली पशु जल में कहाँ से आ गया? लगता है, इसे अपने प्राणों का मोह नहीं रहा अथवा इसे मेरी शक्ति के बारे में ज्ञान नहीं है। दुष्ट! रूप बदल कर तू मुझे भ्रमित नहीं कर सकता। तू अवश्य ही देवताओं का प्रिय विष्णु है, जो हम दैत्यों का सबसे बड़ा शत्रु है। आज तुझे मुझसे कोई नहीं बचा सकता। मैं इसी क्षण अपनी गदा के प्रहार से तेरे टुकड़े-टुकड़े कर दूँगा। फिर देवताओं और ऋषि-मुनियों का भी संहार कर दूँगा, जो इस समय तेरी जय-जयकार कर रहे हैं।'

भगवान वाराह भयंकर गर्जना करते हुए बोले- 'दुष्ट सिंधुसेन! तुझे अपने बल पर बड़ा अहंकार है। आज मैं तेरा वही अहंकार चूर-चूर कर तुझे काल का ग्रास बनाऊँगा। अब तुझे कोई शक्ति नहीं बचा सकती। तूने मेरी शक्ति को ललकारा है। तेरी इच्छा मैं अवश्य पूरी करूँगा। देख मेरा बल और पराक्रम।'


यह कहकर भगवान वाराह ने सिंधुसेन पर अपनी गदा का भीषण प्रहार किया। गदा-प्रहार से वह मीलों दूर जाकर गिरा। किंतु गिरते ही फुर्ती से उठा और गदा लेकर भगवान वाराह से युद्ध करने लगा। देखते ही देखते भगवान वाराह ने उसकी गदा तोड़ डाली। तब वह मुष्टि-प्रहार करने के लिए आगे बढ़ा। बिना कोई अवसर दिए भगवान ने गदा के एक ही प्रहार से उसके प्राण हर लिए।

तभी शंख बज उठे और देवगण भगवान वाराह पर पुष्प-वर्षा कर उनकी स्तुति करने लगे। इसके बाद भगवान वाराह यज्ञ को अपने मुख में रखकर पाताल से निकल आए। तत्पश्चात उन्होंने अपने रक्त-रंजित अंगों को गंगा-स्रोत में धोया। वही स्थान वाराह-कुंड के नाम से प्रसिद्ध हुआ।

इसके बाद उन्होंने अपने मुख से महायज्ञ को निकालकर देवगण को सौंप दिया। चूँकि उनके मुख से यज्ञ का प्रादुर्भाव हुआ था, इसलिए वाराह-तीर्थ परम पवित्र और समस्त कामनाओं को पूर्ण करने वाला तीर्थ माना जाता है। यह तीर्थ वर्तमान में कुरुक्षेत्र के निकट स्थित है।

# कायम अपमान सहन करावा लागून पदरी पडते अपयश, दुःख

## 'या' ४ चुका करणे टाळा; चाणक्यांनी सांगितले सुखी राहण्याचे सिक्रेट



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आज २७ एप्रिल २०२६ चा दिवस आपल्याला जुनी दुःखे मागे सोडून नव्याने सुरूवात करण्याची प्रेरणा देतो. हा दिवस शिकवितो, की जेव्हा आपण मनातील कडवटपणा आणि नकारात्मक आठवणी सोडून देतो तेव्हाच आयुष्यात नवीन आनंदासाठी जागा तयार होते.

चाणक्य नीतीमध्ये एक महत्त्वाचा श्लोक आहे-

'कष्टं च खलु मूर्खत्वं कष्टं च खलु यौवनम् । कष्टात् कष्टतरं चैव परगेहे निवासनम् ।।'

याचा अर्थ असा आहे- मूर्खपणा दुःखदायक असतो, तरुणपणही कष्टदायक असते, पण या सगळ्यांपेक्षा जास्त कष्टदायक म्हणजे दुसऱ्यांच्या घरी राहणे. चाणक्य या श्लोकातून जीवनातील चार मोठ्या चुका सांगतात, ज्या माणसाला दुःख आणि अपमान दोन्ही देतात.

**मूर्खपणा हा सर्वांत मोठा कष्ट**

आचार्य चाणक्य सांगतात, की मूर्ख असणे हे सर्वांत मोठे दुःख आहे. मूर्ख माणूस वारंवार तीच चूक करतो, चांगला सल्ला ऐकत नाही आणि इतरांच्या बोलण्याला सहज बळी पडतो. त्याला स्वतःच्या चुका कळत नाहीत, त्यामुळे त्याला वारंवार अपयश आणि अपमान सहन करावा लागतो. मूर्खपणा म्हणजे फक्त शिक्षणाचा अभाव नाही, तर समज नसणे आहे. जो माणूस आपल्या चुका शिकत नाही, तो पुन्हा पुन्हा त्याच अडचणीत अडकतो. आजपासून 'या' ३ राशीचे लोक राजासारखे जगतील जीवन.

**केंद्रदृष्टी राजयोग करेल प्रचंड श्रीमंत; पैसाच पैसा तर नशिबी मोठे यश**

तरुणपणाचे कष्ट : तरुणपण हा उत्साह आणि ऊर्जेचा काळ असतो, पण चाणक्य त्यालाही कष्टदायक म्हणतात. या वयात माणूस अनेकदा घाईत आणि भावनेत येऊन चुकीचे निर्णय घेतो. राग, घाई, वाईट संगत आणि अहंकार यामुळे तरुणपण कठीण बनते. अनेक तरुण आपली ताकद चुकीच्या दिशेला वापरतात आणि नंतर पश्चात्ताप करतात. चाणक्य सांगतात की तरुणपणात शिस्त आणि विचार ठेवावा. आपली ऊर्जा योग्य कामात वापरावी, शिक्षण, काम आणि चांगल्या सवयींवर लक्ष द्यावे. विचार न करता केलेले काम पुढे आयुष्यभर त्रास देऊ शकते.

**परक्या घरात राहणे सर्वांत मोठे कष्ट**

या श्लोकात चाणक्य दुसऱ्यांच्या घरी राहण्याला सर्वात जास्त कष्टदायक सांगतात. याचा अर्थ दुसऱ्यांवर अवलंबून राहणे, त्यांच्या दयेवर जगणे आणि स्वतःचे स्वातंत्र्य गमावणे. जेव्हा माणूस दुसऱ्यांच्या घरी राहतो, तेव्हा त्याला वारंवार अपमान सहन करावा लागतो. त्याला मान मिळत नाही, स्वतःचे निर्णय घेता येत नाहीत आणि नेहमी इतरांच्या मर्जीने वागावे लागते. चाणक्य नीती शिकवते की आपण स्वावलंबी बनावे. स्वतःच्या कमाईवर जगायला शिकावे, सुरुवातीला कितीही अडचण आली तरी चालेल. स्वातंत्र्यापेक्षा मोठे सुख नाही. 'मे' महिन्यात 'या' ५ राशींच्या आयुष्यात ऐश्वर्य, यश अन् सुख-समृद्धी! पैसा, गाडी, बंगला..., ऐशोआरामात राजासारखे जगाल जीवन.

**या चुका टाळण्याचे उपाय**

चाणक्य नीतीनुसार या चार चुका टाळण्यासाठी काही सोपे उपाय आहेत. दररोज काहीतरी नवीन शिका, पुस्तके वाचा आणि अनुभवी लोकांचा सल्ला घ्या. तरुणपणात भावनांवर नियंत्रण ठेवा आणि विचार करून निर्णय घ्या. स्वावलंबी बना आणि स्वतःच्या कमाईवर विश्वास ठेवा. जुन्या गोष्टी मनात ठेवू नका, चुका झाल्या तर त्यातून शिका आणि पुढे चला.

**आनंदी आयुष्याचे सार**

चाणक्य नीती आपल्याला शिकविते, की दुःख आणि अपमान बहुतेक वेळा आपल्या स्वतःच्या चुका असतात. मूर्खपणा, तरुणपणातील उतावळेपणा, दुसऱ्यांवर अवलंबून राहणे आणि जुन्या कटू आठवणी या गोष्टी माणसाला वारंवार त्रास देतात.

जर आपण समज, शिस्त आणि स्वावलंबन स्वीकारले, तर आयुष्यात आनंद आणि सन्मान दोन्ही मिळू शकतात. चाणक्यांच्या या नीती खूप जुन्या असल्या तरी आजही तितक्याच योग्य आणि उपयोगी आहेत.

# बारा वर्षांनंतर मोहिनी एकादशीचा योग!

## भगवान विष्णूंना पूजा विधीसह या मंत्रांद्वारे केले जाते प्रसन्न



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मोहिनी एकादशीच्या दिवसाला अत्यंत विशेष महत्त्व आहे. या दिवशी भगवान विष्णूंची पूजा-अर्चा केली जाते. याव्यतिरिक्त अनेक स्त्रिया या दिवशी व्रत करतात. अशी श्रद्धा आहे, की या दिवशी उपवास केल्याने व्यक्तीला ऐहिक आसक्ती आणि मोहमयेपासून (मायाजालापासून) मुक्ती मिळण्यास मदत होते. शिवाय यामुळे व्यक्तीच्या स्वभावात शांतता आणि चित्तवृत्तीत स्थिरता निर्माण होण्यासही मदत मिळते. पूजा विधींचे पालन करून आणि मंत्रांचा जप करून व्रत केल्यास जीवनात सकारात्मकता सदैव कायम राहते.

**मोहिनी एकादशी व्रत उद्यापन**

हिंदू पंचांगानुसार मोहिनी एकादशी व्रताचा प्रारंभ सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६ ला झाला. उद्यापन मंगळवार, दि. २८ एप्रिल २०२६ मंगळवार रोजी पहाटे ५ वाजून ३८ मिनिटांपासून ते सकाळी ८ वाजून १७ मिनिटांपर्यंत करता येईल.

**मोहिनी एकादशी पूजा विधी**

एकादशीच्या दिवशी सकाळी 'ब्रह्ममुहूर्तावर' उठून स्नान करावे. स्वच्छ किंवा पिवळ्या रंगाचे वस्त्र परिधान करावे. घरातील देवघरात, एका उंच आसनावर (चौरंगावर) पिवळे वस्त्र अंथरावे आणि त्यावर भगवान विष्णू किंवा 'लाडू गोपाळ' यांची मूर्ती स्थापित करावी. हातात पाणी घेऊन, उपवास करण्याने दृढ संकल्प करावा. यावेळी असे सांगायचे, की हे व्रत एखाद्या विशिष्ट मनोकामना पूर्तीसाठी किंवा केवळ भगवान विष्णूंच्या निस्सीम भक्तीपोटी करीत आहे.

देवतेच्या मूर्तीचा अभिषेक (स्नान विधी) करावा. सर्वप्रथम पवित्र गंगाजलाने आणि त्यानंतर 'पंचामृताने' (दूध, दही, मध, तूप आणि साखर यांचे पवित्र मिश्रण) मूर्तीला स्नान घालावे. त्यानंतर मूर्तीला पुन्हा एकदा स्वच्छ पाण्याने स्नान घालावे आणि देवतेला पिवळ्या रंगाचे वस्त्र परिधान करावे.

देवतेला पिवळ्या चंदनाचा टिळा लावावा आणि पिवळी फुले अर्पण करावीत. वशेषतः 'वैजयंती'ची फुले उपलब्ध असल्यास तीच अर्पण करावीत. शुद्ध तुपाचा दिवा प्रज्वलित करावा आणि उदबत्त्या लावून संपूर्ण वातावरण सुगंधित करावे. देवतेला नैवेद्य अर्पण करावा. या नैवेद्यामध्ये पिवळ्या रंगाची फळे आणि मिठाईचा समावेश असावा. भगवान विष्णूंना अर्पण केल्या जाणाऱ्या कोणत्याही नैवेद्यामध्ये 'तुळशीच्या' पानांचा समावेश करणे अनिवार्य आहे.

**मोहिनी एकादशीसाठीचे शक्तिशाली मंत्र**

**मूळ मंत्र :** 'ॐ नमो भगवते वासुदेवाय।' या मंत्राचा अर्थ असा आहे. 'भगवान विष्णूंना जे वासुदेवाचे पुत्र आहेत, जे सर्वव्यापी आहेत आणि जे सर्व जीवांच्या हृदयात वास करतात त्यांना वंदन करतो.' हा महामंत्र मुक्ती आणि मोक्ष प्रदान करतो, असे मानले जाते.

**स्तुती मंत्र :** 'शान्ताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशम्' याचा अर्थ असा आहे, की ज्याचे रूप अत्यंत शांत आहे; जो शेषनागाच्या शय्येवर विराजमान आहे; ज्याच्या नाभीतून कमळ उगवले आहे; आणि जो देवांचाही स्वामी आहे अशा त्या विष्णूंना, जे संपूर्ण विश्वाचे स्वामी आणि भीतीचा नाश करणारे आहेत, मी माझे वंदन अर्पण करतो.

**मोहिनी रूपाचे ध्यान मंत्र :** 'ॐ मोहिनी स्वरूपाय नमः' याचा अर्थ असा आहे, की प्रभूच्या त्या दिव्य रूपाला वंदन, जे 'मोहिनी' म्हणून ओळखले जाते; जे अज्ञान आणि अंधकार दूर करते आणि आध्यात्मिक साधकाला सत्याच्या मार्गावर मार्गदर्शन करते. मोहिनी एकादशीला केली जाणारी उपासना ही केवळ एक धार्मिक विधी नसून, ती जीवात्म्याचे परमात्म्याशी मिलन घडवून आणण्याची एक संधी आहे. जेव्हा मंत्रांचा जप त्यांच्या अर्थाचे सखोल आकलन करून केला जातो तेव्हा ते थेट हृदयात झंकारतात आणि साधकाच्या जीवनात सकारात्मक उर्जेचा संचार करतात.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)